


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३३३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१४ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# लाडक्या बहिणींसाठी धक्कादायक ! तब्बल ९२ लाख महिलांची नावे वगळली ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून तब्बल ९२ लाख महिलांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. विशेष म्हणजे विजय वडेट्टीवार यांचे आरोप खरे असतील तर एकूण लाभ घेणाऱ्या महिलांपैकी ३८ टक्के महिलांची नावे आता या योजनेतून वगळण्यात आल्याची चर्चा आहे. तसेच १४ हजार पुरुषांनी योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक माहिती देखील काही माध्यमांनी दिली आहे. दरम्यान, या आरोपांवर राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी याबाबतच्या आरोपांवर प्रतिक्रिया दिली आहे.




**मंत्री आदिती तटकरे काय म्हणाल्या?**

९२ लाख महिलांची नावे वगळल्याच्या बातमीत काही तथ्य नाही. बीड जिल्ह्यामध्ये साधारणत: रजिस्ट्रेशन सहा ते साडेसहा लाख महिलांचे रजिस्ट्रेशन होतं. त्यापैकी पात्र ठरलेल्या महिला या चार ते साडेचार लाख महिला आहेत. त्यांना योजनेचा लाभ सुरु आहे. राज्यात आताच्या घडीला १ कोटी ६७ ते ७० लाख महिला ई-केवायसी केल्यानंतर लाभार्थी आहेत, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

**विजय वडेट्टीवार काय म्हणाले?**

आतापर्यंत ९२ लाख महिलांना या योजनेतून वगळ्यात आलं आहे. आता हे जर पुन्हा मतदानाला जातील तर गावातील महिला ह्यांना जाब विचारतील. नितीमत्ता या सरकारची संपली आहे. त्यांना वाटतं की जवळपास निवडणुका नाहीत. सगळ्या निवडणुका संपल्या आहेत. तर आमचं कोण काय करेल? त्यामुळे सरकार मस्तीमध्ये वागत आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**सुधीर मुनगंटीवार काय म्हणाले?**

भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. लाभार्थी महिलांची नावे कमी करु नये. अपात्र असतील तर कमी करावेत. पण ९२ लाख नावे कमी झाले असतील तर ई-केवायसी न झाल्यामुळे कदाचित तसे झाले असेल. त्यावर मग ई-केवायसीसाठी मुदत वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मुदतवाढ दिली तर ही नावे योग्यप्रकारे येऊ शकतात, अशी भूमिका सुधीर मुनगंटीवार यांनी मांडली आहे.

**वर्षा गायकवाड यांचीदेखील टीका**

काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनीदेखील या मुद्द्यावरुन राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. निवडणुकीत मत मिळेपर्यंत लाडकी बहीण आणि सत्ता मिळाल्यानंतर अपात्र बहीण निवडणुकीआधी महिलांना लाडकी बहीण म्हणत त्यांच्या खात्यात पैसे टाकले गेले, पण सत्ता मिळताच तब्बल ९२ लाख महिलांची नावे योजनेतून वगळण्यात आली! हा राज्यातील लाडक्या बहिणींचा विश्वासघात आहे, अशी टीका वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

जर या महिला अपात्र होत्या, तर त्यांना आतापर्यंत लाभ का दिला? आणि जर त्या पात्र होत्या, तर आता त्यांना योजनेतून बाहेर का काढले? ई-केवायसी, उत्पन्न मर्यादा, सरकारी नोकरी, इतर योजनांचा लाभ अशी अनेक कारणे आता दिली जात आहेत. मग हे निकष निवडणुकीपूर्वी कुठे गेले होते? सत्ता मिळवण्यासाठी नियम बाजूला ठेवले आणि आता आर्थिक ताणाचे कारण देत महिलांवर अन्याय केला जात आहे का?, असे सवाल वर्षा गायकवाड यांनी केले.

या योजनेवर हजारो कोटी रुपयांचा खर्च झाला. या पैशांचे नियोजन कोणी केले? चुकीच्या लाभार्थ्यांना पैसे का दिले गेले? आणि या गोंधळाची जबाबदारी कोण घेणार? महिलांच्या सन्मानाचे राजकारण करून, त्यांच्या भावनांशी खेळ करून आणि सत्ता मिळताच त्यांनाच अपात्र ठरवणे, ही जनतेची फसवणूक आहे, अशी टीका देखील वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने माळशिरस तालुक्यातील मळोली येथे गोवा राज्यात निर्मित व महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेल्या विदेशी मद्याच्या वाहतुकीवर धडक कारवाई करत तब्बल १ कोटी २४ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रविवार, १२ जुलै रोजी दुपारी भरारी पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. या कारवाईत ७५० मिली क्षमतेच्या ८,४०० विदेशी मद्याच्या बाटल्या (७०० बॉक्स) जप्त करण्यात आल्या असून, त्यांची अंदाजे किंमत ९२ लाख ४० हजार रुपये आहे. याशिवाय मद्य वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला १४ टायर ट्रक (अंदाजे किंमत ३२ लाख रुपये) तसेच तीन मोबाईल फोन (अंदाजे किंमत ३१ हजार रुपये) असा एकूण १ कोटी २४ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास दुय्यम निरीक्षक सौरभ भोसले करत आहेत.

ही कारवाई निरीक्षक सचिन भवड यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक राकेश पवार, सौरभ भोसले, बाळासाहेब नेवसे, अमित नांगरे, अक्षय सस्ते, स्वप्नील सोनवलकर, प्रितम पडवळ, एस. ए. बिराजदार तसेच जवान योगेश पाटील, प्रविण पुसावळे, देवीदास चौधरी, संजय पराडे, रेवनसिद्ध कांबळे, योगीराज तोग्गी, युवराज टेळे, आबासो कसबे, सचिन भोसले, किरण गोळे, रोहित लोखंडे, सुजित जाधव,




गोवा बनावटीच्या विदेशी मद्याचा साठा जप्त

दिवेश फडतरे, सौरभ गुरव, ओंकार जाधव, महिला जवान कल्पना जाधव आणि वाहन चालक मारुती जडगे यांनी पार पाडली.

दरम्यान, जिल्ह्यात बनावट दारू, हातभट्टी दारू किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर मद्यनिर्मिती, विक्री अथवा वाहतुकीची माहिती नागरिकांनी तात्काळ राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावी, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी केले आहे. यासाठी टोल फ्री क्रमांक १८०० ८३३ ३३३३ तसेच व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सराईत गुन्हेगाराकडून देशी कट्टा व जिवंत काडतूस जप्त

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१३, चंद्रपूर :** राजुरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने धडाकेबाज कारवाई करत एका सराईत गुन्हेगाराकडून गावठी बनावटीचा देशी कट्टा आणि एक जिवंत काडतूस जप्त केले. ही कारवाई १२ जुलै २०२६ रोजी रामनगर सास्ती येथील कोलगाव रोडवरील राममंदिर परिसरात करण्यात आली. या कारवाईमुळे परिसरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलीस उपनिरीक्षक तथा डी.बी. प्रमुख लक्ष्मण लोकरे व गुन्हे शोध पथक अवैध धंद्यांवर कारवाईसाठी परिसरात गस्त घालत असताना खास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रामनगर सास्ती येथील कोलगाव रोडवरील राममंदिर परिसरात एक इसम अग्निशस्त्र बाळगून फिरत आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांच्या उपस्थितीत सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव श्रीराज संग्राम बहुरीया (वय २१ वर्षे), रा. सरदार पटेल वार्ड, बल्लारशाह असे सांगितले. त्यानंतर आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला पॅन्टच्या आत प्लास्टिकच्या पिशवीत लपवून ठेवलेला एक लोखंडी गावठी बनावटीचा सिंगल बॅरल देशी कट्टा व एक जिवंत काडतूस आढळून आले.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये १० हजार रुपये किमतीचा लोखंडी गावठी बनावटीचा सिंगल बॅरल देशी कट्टा असून त्याच्या हँडग्रीपला लाल व काळ्या रंगाचे कापड गुंडाळलेले होते. तसेच ५०० रुपये किमतीचे 'केएफ १२' असे अंकित असलेले एक पिवळ्या धातूचे जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. एकूण १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. प्राथमिक तपासात आरोपी श्रीराज संग्राम बहुरीया हा सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे. तो कोणताही दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे देशी कट्टा व जिवंत काडतूस जवळ बाळगून फिरत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी भारतीय हत्यार कायद्यान्वये कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक नितीन चिंचोळकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईमध्ये पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण लोकरे, सहाय्यक फौजदार किशोर तुमराम, पोलीस हवालदार विक्की निर्वाण, पोलीस हवालदार अनुप डांगे, पोलीस अंमलदार शफीक शेख, महेश बोलगोडवार आणि रमेश बस्सी यांनी सहभाग घेतला.

# तब्बल २८ वर्षे डॉक्टर असल्याचा बनाव करणारा तोतया डॉक्टर अटकेत

## CSR फंडातून सुमारे १० कोटी रुपयांच्या अपहाराचा संशय

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.१३, मुंबई :** मुंबई गुन्हे शाखेच्या प्रकटीकरण कक्ष-०१ ने तब्बल २८ वर्षांपासून डॉक्टर असल्याचा बनाव करणाऱ्या एका तोतया डॉक्टराला अटक केली आहे. आरोपीने डॉ. धर्मेंद्र कुमार या नावाने बनावट ओळखपत्रे तयार करून विविध बँकांमध्ये खाती उघडली होती. त्या खात्यांच्या माध्यमातून इतर साथीदारांसह मागील तीन वर्षांत CSR Fund मधून सुमारे १० कोटी रुपयांचा अपहार केल्याचा प्राथमिक तपासात संशय व्यक्त करण्यात आला आहे.




गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबईच्या कक्ष-०१ ला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कारवाई करण्यात आली. आरोपीच्या फ्लॅटमध्ये महाराष्ट्रासह इतर राज्यांतील व्यक्ती व कंपन्यांची नावे, प्रोजेक्ट रिपोर्ट, तसेच विविध कागदपत्रे आढळून आली. त्यामुळे या गुन्ह्याचे जाळे एका राज्यापुरते मर्यादित नसून अनेक राज्यांमध्ये पसरले असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

झडतीदरम्यान आरोपीकडून डॉ.धर्मेंद्र कुमार असे नमूद असलेले ओळखपत्र, पॅन कार्ड, व्हिसीटींग कार्ड, विविध संस्थांनी दिलेली प्रमाणपत्रे, औषधोपचाराचे साहित्य आणि इतर कागदपत्रे जप्त करण्यात आली.

या प्रकरणी कक्ष-०१, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ७९/२०२६ (जुहू पोलीस ठाणे गु.र.क्र. १०४८/२०२६) अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३३६(१), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३४१(३), ३४१(४), ३(५) तसेच वैद्यकीय व्यवसाय अधिनियम कलम ३३, राष्ट्रीय चिकित्सा आयोग अधिनियम कलम ३४ व ५४ अन्वये १२ जुलै २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. न्यायालयाने आरोपीला १६ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्ण कान्त उपाध्याय, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) राज तिलक रौशन आणि सहायक पोलीस आयुक्त, प्रकटीकरण (डी -दक्षिण) दिनकर शिलवटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पाटील, सहायक पोलीस निरीक्षक सलमानखान पठाण, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शेडगे, पोलीस हवालदार सानप, पोलीस हवालदार चव्हाण, पोलीस शिपाई नारायण चव्हाण, चालक पोलीस हवालदार पोवळकर, पोलीस शिपाई सालके, तसेच जुहू पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस शिपाई करीना म्हात्रे आणि महिला पोलीस शिपाई कविता केंद्रे यांचा सहभाग सक्रिय होता.

# हिडन स्पोर्ट जलतरण क्लबच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**अक्षराज : जफर शेख**




**दि.१३, बोरी :** राजमाता जिजाऊ जलतरण तलाव, नाशिक येथे होणाऱ्या सब-ज्युनिअर व ज्युनिअर राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी हिडन स्पोर्ट जलतरण क्लबच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा दि. १७ व १८ जुलै रोजी पार पडणार आहे.

या स्पर्धेत हिडन स्पोर्ट जलतरण क्लबचे प्रज्ञेश पंडित, अनिरुद्ध पानझाडे, ऋतुराज काटकर, साईशा सौरभ मोकाट, राधिका गिराम आणि अक्षदा गिराम हे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

या सर्व खेळाडूंना डॉ. पंडित सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रवाना होण्यापूर्वी या विद्यार्थ्यांचा सत्कार हिडन स्पोर्ट जलतरण टँकचे मालक श्री. दिलीप माने, इंजि. दिवाकर माने आणि सौरभ मोकाट यांच्या हस्ते करण्यात आला. या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा यावेळी मान्यवरांनी दिल्या.




## बंगले में रहेने दो...!

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून ल्यूटियन्स दिल्लीतल्या '२४ अकबर रोड' या सरकारी बंगल्याचं कोणतंही भाडं मिळालेलं नसून या पक्षानं नवीन 'इंदिरा भवन' कार्यरत झाल्यावरही हाच बंगला ताब्यात ठेवल्याचं ताजं वृत्त, दिल्लीतले सरकारी बंगले, या मुद्द्याकडे नव्यानं पाहण्यास प्रवृत्त करतं. काँग्रेसकडे या बंगल्याची थकबाकी किती आहे, याचा हिशेब करायला केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या इस्टेट संचालनालयाला १३ वर्षं उलटल्यावरही वेळ मिळाला नसावा, हेही माहितीच्या अधिकाराखाली दिलेल्या उत्तरातून समोर आलंय. भाडेथकबाकीची ही बाब प्रत्यक्षात ल्यूटियन्स दिल्लीतल्या सरकारी बंगल्यांमध्ये दशकानुदशके चालत आलेल्या राजकीय पक्षांच्या मुख्यालयांचा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतरही पूर्णपणे न सुटलेल्या प्रश्नाचा भाग आहे. दोन्ही प्रमुख पक्षांसह अनेक राष्ट्रीय पक्षांनी दीनदयाळ उपाध्याय मार्ग परिसरात नव्या मुख्यालयांत स्थलांतर केलं असलं तरी जुन्या सरकारी बंगल्यांचा मोह, त्यांवरील ताबा, भाडेकरार, थकबाकी आणि सरकारी कारवाई यांबाबत अजूनही अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

ब्रिटिशांनी लाल किल्ला, कुतुबमिनार वगैरे मुघलकालीन इमारती उद्ध्वस्त न करता ल्युटियन्स दिल्ली वसवली. ही दिल्ली म्हणजे अख्ख्या देशाचं सत्ताकेंद्र. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक राष्ट्रीय पक्षांना या भागातील सरकारी बंगले मुख्यालय म्हणून वापरण्यासाठी देण्यात आले. अनेक पक्षांची राष्ट्रीय कार्यालयं सरकारी बंगल्यांतूनच चालतात. काळाच्या ओघात सार्वजनिक मालमत्तेचा राजकीय पक्षांकडून वापर हा वादाचा विषय झाला. गेल्या १२ वर्षांत विशंवभरदास रस्ता परिसरात नद्यांच्या नावानं उभारलेली नवी खासदार निवासस्थानं कार्यरत झाल्यावर यातल्या अनेक बंगल्यांत सत्ता वर्तुळातल्या लोकांनी बस्तान बसवलंय. सुमारे शतकापूर्वी उभारलेल्या या जुन्या बंगल्यांची देखभाल दिवसेंदिवस खर्चिक होत आहे. वारसा संवर्धनाच्या नियमांमुळे त्यात मोठे बदल करणंही कठीण ठरतं. सुमारे दशकापूर्वी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे दिल्लीत आले होते, त्याच्या अगदी आधी खासदार संजय राऊत यांच्या फिरोजशहा रस्त्यावरच्या जुन्या बंगल्यात गळती होत होती! आधुनिक सुरक्षा व्यवस्थेसाठी आवश्यक बदल करणंही अनेकदा अवघड जातं. सरकारी मालमत्तेच्या वापराबाबत नियम समान असावेत, अशी मागणी सातत्याने होत असते. पण तळे राखील तो पाणी चाखील, हीच म्हण इथंही लागू पडते.

सरकारी यंत्रणेचा दावा आहे की, '२४ अकबर रोड'च्या मासिक भाड्यापैकी काही देयकं प्रलंबित आहेत; तर काँग्रेसनं ह दावा फेटाळताना हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचं स्पष्ट केलं आहे. अनेक राजकीय पक्ष व नेते सातत्यानं 'ल्युटियन्स दिल्ली', 'खान मार्केट गँग', 'एलिट राजकारण', 'सत्तेचा अभिजन वर्ग' यांच्यावर टीका करतात. वास्तवात याच पक्षांची दिल्लीतील प्रमुख कार्यालये ल्यूटियन्स परिसरात किंवा त्याच्या अगदी जवळ आहेत. ही वस्तुस्थिती भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचा विरोधाभासही अधोरेखित करणारी. कारण राजकारणात विचारधारा जितकी महत्त्वाची तितकीच महत्त्वाची असते सत्ता आणि निर्णयप्रक्रियेच्या केंद्राशी असलेली भौगोलिक जवळीक. संसदेत प्रश्न उपस्थित करणं, मंत्रालयांशी संपर्क ठेवणं यासाठी मंत्री-खासदारांच्या ओएसडी-पीए मंडळींना श्रम पडू नयेत म्हणूनही ही व्यवस्था असावी.

सर्वोच्च न्यायालयानं सरकारी निवासस्थानांचा राजकीय पक्षांकडून अनिश्चित काळ वापर करणं योग्य नसल्याचं नमूद करून केंद्र सरकारला पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश दिले त्याला १४ वर्षं उलटली. नवीन मुख्यालयं सुरू झाल्यानंतरही जुने सरकारी बंगले पूर्णपणे सरकारच्या ताब्यात परत न करणं, हे जर दोन्ही प्रमुख पक्षच करत असतील तर इतरांबाबत काय बोलावं!

सरकारच्या म्हणण्यानुसार '२४ अकबर रोड' बंगल्याचा परवाना करार २६ जून २०१३ रोजी रद्द करण्यात आला. त्यानंतरही काँग्रेसने या बंगल्यावरील ताबा कायम ठेवला असून २०१३ पासून सरकारला दरमहा ३,९२० रुपये याप्रमाणे परवाना शुल्क मिळालेलं नाही. सरकारी दरानुसारच हिशेब केला, तरी पहिली चार वर्षं वगळून पुढील १०८ महिन्यांसाठी किमान ४ लाख २३ हजार ३६० रुपयांची थकबाकी उभी राहते. मात्र काँग्रेसला बंगला रिकामा करण्यासाठी बजावण्यात आलेल्या नोटिशींच्या प्रती देण्यास इस्टेट संचालनालयाने नकार दिला. माहितीच्या अधिकार कायद्याच्या कलम ७(९) अंतर्गत ती माहिती देणं शक्य नसल्याचं संचालनालयानं म्हटलंय.

**- मंगेश वैशंपायन**

# कर्तव्यनिष्ठ तुकाराम मुंडे !

संसद, कार्यपालिका, न्यायव्यवस्था तसेच प्रसार माध्यमे या चार स्तंभावर देशाची लोकशाही ऊभी आहे. संसद हे कायदे मंडळ आहे आणि यामधे जनतेचे लोकप्रतिनिधीं जनहितासाठी कायदे नियम बनवतात, जनहिताचे धोरणात्मक निर्णय घेतात तर कार्यपालिका म्हणजेच प्रशासन हे कायद्याचे राज्य राबविते आणि त्यासाठी आयएएस तसेच आयपीएस तसेच प्रशासकीय अधिकारी आपली जबाबदारी, कर्तव्य पार पाडतात तर न्यायव्यवस्थेकडे घटनेच्या चौकटीत राहून शासन-प्रशासन काम करते आहे कि नाही बनवलेले कायदे हे घटनेचे ऊल्लंघन करत नाही ना हे पहाण्याची तसेच न्यायदान आणि जनतेच्या मुलभूत हक्कांचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे. चौथा स्तंभ म्हणून प्रसार माध्यमे, प्रिंट - इलेक्ट्रॉनिक मिडिया कडे पाहिले जाते आणि या स्तंभाने समाजाचा जागल्याच्या भुमिकेतुन आपली जबाबदारी पार पाडायला हवी हे अपेक्षित आहे. चारही स्तंभाच्या भुमिका, अधिकार वेगवेगळे असले तरी चौघांनी ऐकमेकांना पुरक भुमिकेतुन देशाचा कारभार करणे अपेक्षित आहे त्याच बरोबर बॅलन्स ऑफ पॉवर चे संतुलन राखणे अपेक्षित आहे याच साठी घटनाकारांनी चेक अँण्ड बॅलन्स अशी शासन व्यवस्था बनवली आहे मात्र दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून राजकारण आणि सत्ताकारणाचे संदर्भच बदलुन गेले आहेत त्याप्रमाणे शासन-प्रशासन व्यवस्था देखील बदलली आहे.

महाराष्ट्रातील बीड सारख्या जिल्ह्यातुन सामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या तुकाराम मुंडे यांनी आयएएस अधिकारी म्हणून राज्यातुन सुरवात केली. कामात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, स्वच्छ चारित्र्य, भ्रष्टाचाराची चीड या चांगल्या गुणांचा अंगिकार करीत त्यांनी आपली कारकीर्द सुरू केली, मात्र त्यांची ही कार्यपद्धती भ्रष्ट व्यवस्थेला कधीच रुचणारी नाही. जिकडेतिकडे जे वातावरण आहे ते पहाता या व्यवस्थेत तुकाराम मुंडे कधीच फिट बसु शकत नाही.समाजातील अशा प्रवृत्तींना मुंडे यांचे वावडे असले तरी सर्व सामान्य जनता मुंडे कडेच आशेचा किरण म्हणून पहाते. मुंडे यांनी सोलापूर चे जिल्हाधिकारी, नवी मुंबई, नाशिक, नागपूर महापालिकेचे आयुक्त, पीएमपीएल चे कार्यकारी व्यवस्थापक, मंत्रालयात अनेक पदांवर काम करून आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांच्या कार्याची पावती त्यांना नागपूर आयुक्त पदावरून बदली झाली तेव्हा जनतेने उस्फूर्तपणे दिली होती. शेवटी जनता चांगले वाईट काय हे जाणतेच.मात्र ज्यांच्या हाती राज्यव्यवस्था आणि प्रशासन यंत्रणा राबविण्याचे अधिकार आहे त्यांना मात्र मुंडे यांच्या सारखे अधिकारी नकोसे असतात,म्हणूनच मुंडे यांची जेवढी वर्षे सेवा झाली त्यापेक्षा जास्त वेळा बदली झाली. वास्तविक एका पदावर अधिकाऱ्यांला कमीत कमी तीन वर्षे काम करता आले पाहिजे असे संकेत आहेत मात्र प्रशासकीय सोय या गोंडस



नावाखाली कधीही सोयीनुसार बदली केली जाते. मुंडे यांच्या सारखेच कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून अरूण भाटिया, गो. रा खैरनार, महेश झगडे, अशा अनेकांनी निर्भयपणे आपले कर्तव्य बजावले मात्र त्यांचीच कोंडी करुन त्यांनाच त्रास देण्यात आला,मात्र तरीही त्यांनी कधी तडजोड केली नाही. आजच्या वातावरणात असे अपवाद फार कमी दिसतात .आता अखेर तुकाराम मुंडे यांच्याकडे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून जबाबदारी दिली आणि ते कामाला लागले, भेसळखोरांविरूद त्यांनी मोहिम ऊघडली याचे जनता स्वागत करत आहे. एक व्यक्ती म्हणून प्रवाहाविरुद्ध तग धरणे वाटते तितके सोपे नाही मात्र तुकाराम मुंडे हे जिथे जातील प्रवाहाविरुद्ध जाऊन आपले कर्तव्य पार पाडत आहेत ते कधीही नाऊमेद झाले नाही कि दबावाला बळी पडले नाहीत.

ऐकमेकांवर चेक अँण्ड बॅलन्स न रहाता आता मात्र सगळे ऐकमेकांच्या हातात हात घालून आपण सगळे भाऊ भाऊ मिळून सारे लुटून खाऊ अशाच पद्धतीने कारभार करत आहेत आणि भ्रष्टाचार आवडे सर्वांना अशीच परिस्थिती जिकडेतिकडे दिसते आहे, त्याचीच परिणती म्हणजे गल्लीपासून दिल्लि पर्यंत चिरीमिरी पासुन सुरु झालेला भ्रष्टाचार आता करोडो पर्यंत पोहचला ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती राहिली आहे कारण ऐकमेका सहाय्य करू अवघे साधु हित आपुले अशा पद्धतीने सगळे हातात हात घालून काम करत आहेत आणि अशीच मंडळी करोडो रुपयांची मालमत्ता अवघ्या अल्पकाळात कमावतात. आपल्या अधिकाराचा, पदाचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच अधिक होत आहे तो अशा प्रवृत्तींकडुन. प्रामाणिक राजकारणी आणि प्रामाणिक प्रशासकीय अधिकारी सापडणे कठीण झाले आहे, अशात तुकाराम मुंडे यांच्या सारख्या अधिकाऱ्याची कर्तव्यनिष्ठता आणि प्रामाणिकपणा जनतेला भावतो जे आपली बांधिलकी देशाशी, जनतेशी आहे याचे भान ठेवून आपली जबाबदारी पार पाडतात कर्तव्य समजुन आपले काम करतात. जनतेने देखील अशा अधिकाऱ्यांच्या पाठिशी ऊभे रहाणे गरजेचे आहे. अशाच अधिकाऱ्यांना समाज दिर्घकाळ लक्षात ठेवतो आणि सन्मान करतो.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# ७/११ च्या साखळी बॉम्बस्फोटाचे खरे आरोपी केव्हा पकडले जाणार ?

११ जुलै २००६ या गुरुपौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी गर्दीच्या वेळी पश्चिम रेल्वेमार्गावरील वांद्रे ते भाईंदर रेल्वे स्थानकांदरम्यान सायंकाळी ६.२४ ते ६.३५ या ११ मिनिटांच्या काळात एकामागोमाग एक असे ७ लोकल गाड्यांमध्ये भीषण स्फोट झाले. १९९३ च्या बॉम्बस्फोटाप्रमाणे या स्फोटांसाठीही आरडीएक्सचा वापर करण्यात आला होता. हे स्फोट इतके भीषण होते कि रेल्वे डब्यांच्या चिंधड्या झाल्या. १८९ निष्पाप नागरिकांचा यामध्ये बळी गेला तर ८०० हुन अधिक घायाळ झाले होते. अनेकांचे संसार उध्वस्त झाले, अनेक जण पोरके झाले तर कितीतरी जण आयुष्यभरासाठी कायमचे जायबंदी झाले. ११ जुलै २०२६ ला या घटनेला २० वर्ष पूर्ण झाली. यानिमित्ताने पश्चिम रेल्वेकडून मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रकरणी पकडल्या गेलेल्या सर्व आरोपींची गेल्या वर्षी



जुलै महिन्यातच मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. पोलिसांनी सादर केलेले पुरावे आणि आरोपींनी दिलेल्या कबुलीजबाबाच्या आधारावर सत्र न्यायालयाने १२ आरोपींपैकी ५ जणांना फाशीची शिक्षा सुनावली तर अन्य आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. ज्या पुराव्याच्या आधारावर सत्र न्यायालयाने ही शिक्षा सुनावली होती तो पुरावाच उच्च न्यायालयाने अस्वीकार्य ठरवल्याने सर्व आरोपींची गेल्या वर्षी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. ज्यांनी आपल्या घरातील माणूस गमावला त्यांची उणीव भरून येणारी नसली तरी सत्र न्यालयालयाच्या निकालाने त्यांना दिलासा नक्कीच मिळाला होता; मात्र उच्च न्यायालयाने सर्वच आरोपींना निर्दोष सोडल्याने त्यांची घोर निराशा झाली.

आमच्यावर टाकलेली जबाबदारी आम्ही पार पाडली, आरोपींचा विरोधात सरकारी पक्ष एकही आरोप सिद्ध करू शकला नाही, हे प्रकरण सुटले आहे असा खोटा ठसा निर्माण केल्याने जनतेच्या विश्वासास तडा जातो अशी टिपणी या निकालानंतर न्यायमूर्तींनी दिली होती. सत्र न्यायालयाने दिलेला निकाल उच्च न्यायालय खोटा ठरवते तर कोणाचा निकाल खरा समजावा ? देशाच्या सुरक्षा व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या या अत्यंत महत्वाच्या गुन्ह्याच्या बाबतीत पोलिसांनी त्यावेळी तपासात उणीव सोडली का ? पुरावे गहाळ करण्यात आले का ? त्यावेळी पोलिसांवर कोणाचा दबाव होता का ? यामध्ये तत्कालीन सत्ताधारी पक्षावर कोणाचा दबाव होता का ? तपासात त्रुटी ठेवणाऱ्या तपास अधिकाऱ्यांची आता चौकशी होणार का ? आरोपी जर निर्दोष आहेत तर बॉम्बस्फोट तरी कोणी केले ? बॉम्बस्फोटात ज्यांचे नाहक बळी गेले त्यांच्या प्राणांना काहीच मोल नाही का ? बळी गेलेल्यांच्या नातेवाइकांना न्याय केव्हा मिळणार ? कि त्यांनी आयुष्यभर न्यायाची वाट पहात जीवन कंठायचे ? असे एकनाविध अनेक प्रश्न सामान्य जनतेच्या मनात निर्माण झाले. पैशाने न्याय विकत घेता येतो, न्यायाचा आवाज दाबता येतो असे चित्रपटांतून पाहिले होते, कथांतून वाचले होते. इथे तर दहशतवादी कृत्याच्या माध्यमातून देशाच्या सुरक्षा व्यवस्थेलाच आव्हान दिले गेले होते. आणि हे आव्हान तर आपल्याला पेलता नाहीच आले उलट आपल्याच नागरिकांना न्याय देण्यात आपण अपयशी ठरलो. सर्वोच्च न्यायालयानेही मुंबई उच्च न्यायालयाच्या या निकालात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे त्यामुळे १९ वर्षांनंतर या प्रकरणाचा पुन्हा नव्याने तपास सुरु करण्यात आला आहे. ११ जुलै २००६ ला हा स्फोट झाल्यानंतर के. पी. रघुवंशी यांच्या नेतृत्वाखाली एटीएसने तपास सुरु करून हा स्फोट लष्कर ए तोयबाने भारतातील सिमी संघटनेच्या मदतीने केला असल्याचे जाहीर केले तत्कालीन पोलीस आयुक्त ए.एन. रॉय यांनीही याला दुजोरा दिल्याने मकोका न्यायालयाने २०१५ साली पकडलेल्या १२ आरोपींना दोषी ठरवून त्यापैकी ५ जणांना फाशीची आणि अन्य ७ आरोपीना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मुंबई गुन्हे शाखेने इंडियन मुजाहिदीनच्या सादिक शेखला अटक केली असता २००६च्या रेल्वे साखळी स्फोटामध्ये इंडियन मुजाहिदीनचा हात असल्याची कबुली त्याने दिली. इंडियन मुजाहिदीनचा सह संस्थापक यासिन भटकळ यानेही गुजरात दंगलीचा सूड उगावण्यासाठी इंडियन मुजाहिदीनने रेल्वे बॉम्बस्फोट घडवून आणल्याचे २०१३ मध्ये सांगितले यामुळे नक्की कोणाचे खरे हा पेच निर्माण झाला ज्यामुळे एटीएसच्या एकूण तपासावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले ज्याचा लाभ पकडल्या गेलेल्या आरोपींना झाला. आता या प्रकरणाचा पुन्हा नव्याने तपास सुरु करण्यात आला आहे. हा तपास किती काळात पूर्ण होणार आणि कधी खरे आरोपी पकडले जाणार आणि कधी पीडितांना न्याय मिळणार हे पाहणेच हे येणार काळच ठरवू शकतो !

**– सौ.मोक्षदा घाणेकर.**
**काळाचौकी, मुंबई**

## उपमर्द व्रण

कुणी करे अवमान
अस्मिते वरती घण
उपमर्द चारचौघात
कायम सतावे व्रण

छबी अशी डागाळे
मनपटलांवर मुद्रण
मैत्री वृध्दी दूर राही
वैरभावासआमंत्रण

चारित्र्य हो प्र दुषित
दुसंस्कारअभिमंत्रण
शब्द शस्त्रा धार दार
विदार्णले अंतःकरण

रक्तात कुत्सितपणा
स्थिरावतेअभिसरण
भेसूर स्वभाव दर्शन
स्वता करे अनावरण

मतभेद विसरा कधी
घालायं हवे आवरण
दुश्मनी किती गहिरी
निदान नको विवरण

अधिक तीव्र मनभेद
घालतो वाचेअभारण
तसेच वाढवे मतभेद
मनावर नसे नियंत्रण

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# वारीमार्गात 'पितांबरी' चा सेवाभावी उपक्रम !

आषाढी एकादशी अगदी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने देशभरातील वारकरी पृथ्वीवरील वैकुंठ अर्थात पंढरपूर नगरीच्या दिशेने प्रस्थान करू लागली आहेत. आठशेहुन अधिक वर्षांची परंपरा लाभलेली 'पंढरीची वारी' हे महाराष्ट्राचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. आषाढी एकादशी जवळ आली कि प्रत्येक वारकऱ्याला आस लागते ती भगवंत भेटीची. खांद्यावर भगवी पताका माळून विठूनामाचा गजर करत वारकरी वारीला निघतो. ऊन पावसाची तमा न बाळगता, तहानभूक विसरून माऊलीच्या भेटीसाठी निघालेला हा विठूभक्त जेव्हा दमतो, थकतो तेव्हा क्षणभर विश्रांतीसाठी थांबतो. अशावेळी त्याला चालण्याचे पुन्हा बळ मिळावे, त्याच्यात उत्साह यावा यासाठी 'पितांबरी' नामांकित आस्थापनाच्या वतीने दरवर्षी वारीमार्गावर वारकऱ्यांच्या हाता-पायांना वेदनाशामक तेल लावून मसाज केले जाते. पितांबरीचे स्वयंसेवक दमलेल्या वारकऱ्यांची मायेने विचारपूस करतात. त्यांच्या हाता-पायांना, पाठीला पितांबरीचेच उत्पादन असलेले 'क्युअर ऑन' वेदनाशामक तेल लावून मसाज करतात. हाडांच्या दुखण्यासाठी प्रभावी असलेल्या या तेलाच्या मालिशमुळे वारकऱ्यांनाही वेदनेपासून आराम मिळतो. शेकडो कोलोमीटरचा पायी प्रवास करून वारकरी शरीराने थकला असला, तरी विठूमाऊलीच्या दर्शनाची आस मनी असल्याने त्याचे मन थकत नाही. त्यामुळे पुन्हा एकदा तेवढ्याच उत्साहाने तो पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होतो. दरवर्षी वारीकाळात हजारो वारकऱ्यांचे हातापायांचे दुखणे पितांबरी दूर करत असते. वयोवृद्ध, तपोवृद्ध वारकऱ्यांच्या सेवेच्या मोबदल्यात त्यांच्या आशीर्वादाचा ठेवा जमा करत पितांबरीचा हा सेवाभावी उपक्रम मागील १७ वर्षांपासून अविरतपणे सुरु आहे. उद्योगासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचा दरवर्षी हजारो वारकरी लाभ घेत असतात. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी राज्य सरकारचे वैद्यकीय पथक वारकऱ्यांच्या सेवार्थ वारीमार्गात कार्यरत झाले आहे; मात्र प्रतिवर्षी वारीला वाढत जाणारी वारकऱ्यांची संख्या पाहता हे पथकही अपुरे पडते. आजमितीला राज्यात अनेक औषधी कंपन्या आहेत ज्या राज्यात व्यवसाय करून आज मोठ्या झाल्या आहेत. त्यांनीही पितांबरीच्या या उपक्रमातून बोध घेऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढाकार घ्यावा !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### चरेगाव - शिवाजीनगर पाणंद रस्त्याची दुरावस्था



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, उंब्रज (सातारा) :** कराड तालुक्यातील चरेगाव येथून सुकाई मंदिर मार्गे कळंत्रेवाडी हद्दीतून शिवाजीनगरकडे जाणारा महत्त्वाचा पाणंद रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत असून त्याच्या डागडुजी व विकासासाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे. सध्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचत असल्याने वाहने अक्षरशः रुतून बसत आहेत. पावसाळ्यात या मार्गावरून दुचाकी, ट्रॅक्टर तसेच शेतमाल वाहून नेणारी वाहने चालविणे अत्यंत कठीण बनते. परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानासोबतच मोठा मनस्तापही सहन करावा लागत आहे. हा पाणंद रस्ता अनेक शेतजमिनींना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. शेतीसाठी लागणारे बियाणे, खते, औषधे तसेच काढलेला शेतमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी याच मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र रस्त्याची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत असल्याने शेतीची कामेही प्रभावित होत आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित विभागाकडून या रस्त्याची कायमस्वरूपी सुधारणा झालेली नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात हीच समस्या उद्भवते. रस्त्यावर मुरूम टाकणे, पाणी निचऱ्याची व्यवस्था करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी मजबुतीकरणाची कामे तातडीने करणे गरजेचे असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे. या पाणंद रस्त्यासाठी शासनाने विशेष निधी मंजूर करून दर्जेदार विकासकामे हाती घ्यावीत, जेणेकरून शेतकऱ्यांचा दैनंदिन प्रवास सुरक्षित होईल आणि शेतमालाची वाहतूक सुरळीतपणे करता येईल, अशी मागणी परिसरातील नागरिक आणि शेतकरी वर्गातून होत आहे.

### पर्यावरण संवर्धनासाठी सामाजिक बांधिलकीचा आदर्श; जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांसह मान्यवरांची उपस्थिती



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी समाजातील विविध संस्था पुढाकार घेत असताना, चांदा क्लब, चंद्रपूर यांच्या वतीने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम – अभिनव उपक्रम अंतर्गत सरदार पटेल मेमोरियल सोसायटी (ट्रस्ट), चंद्रपूर यांच्या नावाने वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम शहरात विशेष चर्चेचा विषय ठरला.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वसुमना पंत, पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकीत सिंह, सरदार पटेल मेमोरियल सोसायटीचे अध्यक्ष विनोद दत्तात्रय, चांदा क्लबचे सचिव तथा गोंडवाना विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. कीर्तीवर्धन दीक्षित, राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, रिसर्च अँड टेक्नॉलॉजी (आरसीईआरटी) चंद्रपूरचे प्राचार्य डॉ.अनिल झेड. चिताडे, महाविद्यालयाचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच चंद्रपूर शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. वाढते तापमान, जंगलांची होणारी घट, हवामान बदल आणि प्रदूषण या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. केवळ वृक्षारोपण करून न थांबता त्यांचे संगोपन करणे हीच खरी पर्यावरण सेवा असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

सरदार पटेल मेमोरियल सोसायटी (ट्रस्ट), चंद्रपूर ही संस्था राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, रिसर्च अँड टेक्नॉलॉजी (आरसीईआरटी)च्या माध्यमातून गेली अनेक दशके गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच सामाजिक जाणीव, पर्यावरण संरक्षण, राष्ट्रनिर्माण आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना निर्माण करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. शिक्षणासोबत समाजोपयोगी कार्याला दिलेले प्राधान्य ही संस्थेची वैशिष्ट्यपूर्ण ओळख बनली आहे. संस्थेच्या नावाने करण्यात आलेले हे वृक्षारोपण पर्यावरण संवर्धनाबाबतची संस्थेची दृढ भूमिका आणि सामाजिक उत्तरदायित्व अधोरेखित करणारे ठरले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांसह समाजातील नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी चांदा क्लब, चंद्रपूर यांनी आयोजित केलेल्या या पर्यावरणपूरक आणि प्रेरणादायी उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. पर्यावरण संरक्षणासाठी शासन, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि नागरिक यांनी एकत्रितपणे अशाच प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. आयोजकांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानून भविष्यातही अशा सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### नशामुक्त व बालविवाहमुक्त छ.संभाजीनगर ३१ जुलैपर्यंत राबविणार जनजागृती मोहिम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, छ.संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत नशामुक्त व बालविवाहमुक्त छत्रपती संभाजीनगर पंधरवाडा राबविण्यात येणार आहे. पोलीस, शिक्षण, महिला बालकल्याण इ. विभागही या मोहिमेत सहभागी होणार असून सोमवार, दि.१३ जुलै पासून सुरु होणाऱ्या या पंधरवाड्यात जनजागृती करण्यात येणार आहे. शुक्रवार, दि.३१ जुलै पर्यंत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेचे उद्घाटन सोमवार, दि.१३ जुलै रोजी मंथन सभागृह, एमआयटी कॉलेज, बीड बायपास रोड येथे सकाळी साडेदहा वा. होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे हे राहणार असून अध्यक्षस्थानी महापौर समीर राजूरकर, प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे राहणार आहेत.यावेळी महापालिकेचे आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अध्यक्ष मिन्नू पी.एम., पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क अभिनव बालुरे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, प्रादेशीक उपायुक्त डॉ.दीपक खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर, पोलीस उपअधीक्षक (अंमलीपदार्थ विरोधी टास्क फोर्स) साईनाथ ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास उपस्थितीचे आवाहन जिल्हा समाजकल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोमल कोरे, नशामुक्त भारत अभियान जिल्हा समिती सदस्य विलास चंदने यांनी केले आहे.

## शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणार - आ.जोरगेवार

### मोरवा येथील जि.प.शाळेच्या नव्या इमारतीचे आ.जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शाळांमध्ये आवश्यक सुविधा निर्माण करणे, शिक्षकांची कमतरता दूर करणे आणि पालकांनी मुलांना नियमितपणे शाळेत पाठविणे आवश्यक आहे. शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी सामूहिक प्रयत्न करावेत. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे, असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

दीड कोटी रुपयांच्या निधीतून मोरवा येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीचे लोकार्पण आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी संदिप यादव, विस्तार अधिकारी सुनिल मुत्यलवार, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता बारहाते, उपशिक्षणाधिकारी पांडुरंग कोटेकर, मोरवा सरपंच स्नेहा साव, उपसरपंच भुषण पिदुरकर, मुख्याध्यापक शंकर आत्राम, बलराम डोडाणी, ग्रामीण युवा मोर्चा अध्यक्ष आशिष वाढई, नकुल वासमवार, सचिन साव, प्रविण सिंग, दुर्गा बावणे, दयानंद नागरकर, प्रेम गंगाधरे, आदि मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.





यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी सर्वांनी सकारात्मक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तम दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शाळांमध्ये शैक्षणिक सुविधा, अभ्यासासाठी पोषक वातावरण आणि गुणवत्तापूर्ण अध्यापन उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, अनेक शाळांमध्ये शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. ही बाब लक्षात घेऊन कंत्राटी पद्धतीवर शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. विद्यार्थ्यांना नियमित अध्यापन मिळावे, त्यांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण व्हावा आणि शिक्षणाची गुणवत्ता अबाधित राहावी यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

**मोरवा येथील समाज भवनाचे आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण**

मोरवा येथे नव्याने बांधण्यात आलेल्या समाज भवनाचे लोकार्पण सोमवार, दिनांक १३ जुलै रोजी आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ, स्थानिक नागरिक आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना आ.किशोर जोरगेवार यांनी समाज भवन हे गावातील सामाजिक, सांस्कृतिक आणि सामुदायिक उपक्रमांसाठी उपयुक्त ठरेल, असे सांगितले. या भवनामुळे ग्रामस्थांना विविध कार्यक्रमांसाठी एक सुसज्ज व सोयीस्कर व्यासपीठ उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी समाज भवनात राहिलेल्या अनुषंगिक कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन आ. किशोर जोरगेवार यांनी दिले. ग्रामस्थांनी समाज भवनाच्या लोकार्पणाबद्दल समाधान व्यक्त करत आमदार किशोर जोरगेवार यांचे आभार मानले.

## ‘महागाईच्या काळात १९ ते २० हजार रुपयांत संसार अशक्य’

### एमएसएसएफ जवानांच्या मानधन वाढीसाठी खा.सोनवणे यांचा पुढाकार; राज्य सुरक्षा महामंडळाला पत्र

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१३, केज (बीड) :** महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSF) मध्ये कार्यरत हजारो जवानांच्या आर्थिक अडचणींचा प्रश्न ऐरणीवर आणत बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी त्यांच्या मानधनात तातडीने वाढ करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र पाठवून जवानांच्या विद्यमान वेतन संरचनेचा पुनर्विचार करून त्यांना सन्मानजनक मानधन देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत राज्यातील विविध शासकीय कार्यालये, मंत्रालय, न्यायालये, निमशासकीय संस्था, शैक्षणिक संस्था तसेच विविध सार्वजनिक आस्थापनांमध्ये सुरक्षा सेवा



पुरविण्यात येत असून, या ठिकाणी कार्यरत जवान अत्यंत जबाबदारीने आणि दक्षतेने आपली कर्तव्ये बजावत आहेत. राज्याच्या सुरक्षाव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असलेल्या या जवानांवर मोठी जबाबदारी असतानाही त्यांच्या मानधनाचा प्रश्न अद्यापही कायम असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

सध्या एमएसएसएफ जवानांना सुमारे २८ हजार रुपये मासिक मानधन दिले जाते. मात्र, विविध वैधानिक कपातीनंतर त्यांच्या हातात प्रत्यक्षात केवळ १९ ते २० हजार रुपये इतकीच रक्कम उरते. आजच्या वाढत्या महागाईच्या काळात एवढ्या अल्प उत्पन्नातून कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च, घरभाडे तसेच दैनंदिन गरजा भागविणे अत्यंत कठीण झाले असल्याचे सोनवणे यांनी पत्रात स्पष्ट केले आहे.

त्यांनी पुढे म्हटले आहे की, एमएसएसएफचे जवान दिवसरात्र विविध संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था सांभाळत असतात. अनेकदा सण-उत्सव, आपत्कालीन परिस्थिती आणि विशेष बंदोबस्तादरम्यानही त्यांना अखंड सेवा द्यावी लागते. एवढी जबाबदारी पार पाडणाऱ्या जवानांना त्यांच्या कार्याच्या तुलनेत मिळणारे मानधन अत्यल्प असल्याने त्यांच्यामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाने जवानांच्या मानधनाचा सर्वंकष आढावा घेऊन तातडीने वेतनवाढीचा निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी खासदार सोनवणे यांनी केली आहे. तसेच, राज्य सरकारने या प्रश्नाकडे केवळ आर्थिक बाब म्हणून न पाहता सुरक्षा यंत्रणेतील कर्मचाऱ्यांच्या सन्मान आणि सामाजिक सुरक्षिततेशी संबंधित विषय म्हणून गांभीर्याने विचार करावा, असेही त्यांनी पत्रातून सुचविले आहे. एमएसएसएफ जवानांच्या वेतनवाढीचा प्रश्न गेल्या काही काळापासून सातत्याने चर्चेत आहे.

विविध कर्मचारी संघटनांकडूनही मानधन वाढविण्याची मागणी होत असताना आता खासदार बजरंग सोनवणे यांनी अधिकृतपणे हा मुद्दा राज्य सुरक्षा महामंडळासमोर मांडल्याने या प्रश्नाला नवे राजकीय बळ मिळाले आहे. त्यामुळे राज्य सरकार आणि महामंडळ याबाबत कोणता निर्णय घेते, याकडे राज्यभरातील हजारो एमएसएसएफ जवानांचे लक्ष लागले आहे.

## परभणी जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट

### पावसाअभावी बळीराजा हवालदिल; व्यापारी वर्गही चिंतेत, ग्रामीण अर्थचक्र ठप्प होण्याची भीती

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१३, परभणी :** परभणी जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाने दडी मारल्याने संपूर्ण जिल्ह्यातील बळीराजा अभूतपूर्व संकटात सापडला आहे. मोठ्या आशेने लाखो रुपयांचा खर्च करून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर पिके कोमेजू लागली आहेत. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारख्या पिकांना जीवनदायी पावसाची अत्यंत गरज असताना वरुणराजाने पाठ फिरवल्याने



शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाची जागा आता चिंतेने घेतली आहे.

जून महिन्याच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पेरणी पूर्ण केली. मात्र त्यानंतर पावसाने घेतलेल्या दीर्घ विश्रांतीमुळे शेतातील पिके करपू लागली असून अनेक भागात दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले आहे. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर झालेला मोठा खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. अनेक शेतकरी दररोज आकाशाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहत आहेत. या परिस्थितीचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसत आहे.


परभणी, जिंतूर, बोरी, सेलू, मानवत, गंगाखेड, पाथरी, पूर्णा, पालम आणि सोनपेठसह जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये व्यवहार मंदावले आहेत. कृषी अवलंबून असलेला व्यापारी वर्गही मोठ्या चिंतेत असून खत-बियाणे विक्रेते, कृषी सेवा केंद्रे, किरकोळ व्यापारी आणि इतर व्यवसायिक आर्थिक मंदीची झळ सहन करत आहेत.

## मारजवाडी (पुनर्वसन) ते मुक्रमाबाद बससेवा सुरू करण्याची ग्रामस्थांची मागणी

### ग्रामपंचायतीचा ठराव मंजूर; विभागीय नियंत्रकांकडे नियमित बससेवा सुरू करण्यासाठी निवेदन सादर

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१३, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्पग्रस्त मारजवाडी (पुनर्वसन) येथील ग्रामस्थांनी गाव ते मुक्रमाबाद दरम्यान नियमित एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी केली आहे. याबाबत ग्रामपंचायतीने ठराव मंजूर करून विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड यांच्याकडे निवेदन सादर



केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मारजवाडी हे लेंडी प्रकल्पातील पुनर्वसित गाव असून गावाला जवळच्या शहराशी जोडणारी नियमित सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नाही. गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौथीपर्यंतच असल्याने पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मुक्रमाबाद येथे जावे लागते. मात्र बससेवा नसल्याने विद्यार्थी, कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ईटग्याळ,गोणेगाव, मारजवाडी ईत्यादी खेड्यातुन शंभरहून अधिक विद्यार्थी, कामगार आणि नागरिक दररोज प्रवास करतात. गावातील मुक्रमाबाद हे सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असल्याने नियमित बससेवा सुरू झाल्यास शैक्षणिक, आरोग्य, बाजारपेठ तसेच शासकीय कार्यालयांपर्यंत पोहोचणे सोईचे होईल. त्यामुळे गावच्या आर्थिक व सामाजिक विकासालाही चालना मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी लवकरात लवकर बससेवा सुरू करून प्रवाशी व शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी विभागीय नियंत्रकांकडे केली असून निवेदनाची प्रत मुखेड आगार प्रमुखांनाही देण्यात आली आहे.

# आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने सुटला ५ रुपयांच्या कोर्ट फी तिकिटांचा प्रश्न

## नोंदणी महानिरीक्षकांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून भासत असलेल्या ५ रुपयांच्या कोर्ट फी तिकिटांच्या तुटवड्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराला यश आले आहे. वकील, त्यांच्या कारकूनांसह सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणारी ही समस्या सोडविण्यासाठी आ. मुनगंटीवार यांनी राज्याचे नोंदणी महानिरीक्षक तथा नोंदणी व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. त्यांच्या हस्तक्षेपानंतर प्रशासनाने तातडीने आवश्यक कार्यवाही करत



चंद्रपूर जिल्हाभर ५ रुपयांच्या कोर्ट फी तिकिटांची उपलब्धता सुनिश्चित केली आहे.

चंद्रपूर शहरासह जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये अनेक वर्षांपासून ५ रुपयांच्या कोर्ट फी तिकिटांचा तुटवडा जाणवत होता. परिणामी, अनेक अर्जांवर आवश्यक असलेले ५ रुपयांचे तिकीट उपलब्ध नसल्यामुळे नागरिक, वकील आणि इतर विधी व्यावसायिकांना १० रुपयांची कोर्ट फी वापरण्याची वेळ येत होती. त्यामुळे अनावश्यक आर्थिक भार आणि गैरसोयीचा त्यांना सामना करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल घेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे नोंदणी महानिरीक्षक तथा नोंदणी व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांना पत्र पाठवून चंद्रपूर जिल्ह्यास ५ रुपयांच्या कोर्ट फी तिकिटांचा पुरेसा पुरवठा करण्याची विनंती केली. त्यांच्या पत्राची तातडीने दखल घेत नोंदणी महानिरीक्षकांनी जिल्हा मुद्रांक प्रशासनाकडून परिस्थितीचा आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलत ५ रुपयांच्या कोर्ट फी तिकिटांची जिल्हाभर उपलब्धता सुनिश्चित केली. त्यामुळे अनेक वर्षांपासून भेडसावत असलेला प्रश्न मार्गी लागला असून, वकील, विधी व्यावसायिक आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळालाआहे. या निर्णयामुळे जिल्हा न्यायालयातील शेकडो वकील, वकिलांचे कारकून, इतर विधी व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी सोय झाली आहे. ५ रुपयांच्या कोर्ट फी तिकिटांचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल ॲड. योगेश्वर पचारे यांनी सर्व वकिलांच्या वतीने आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे.

# कोकणवासी यांकरिता ठाणे स्टेशनवर दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, ठाणे :** आगामी गौरी-गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास अधिक सुलभ आणि सुखकर व्हावा, यासाठी खासदार नरेश म्हस्के यांच्या मागणीची दखल घेत मध्य रेल्वे प्रशासनाने ठाणे रेल्वे स्थानकाजवळील आरक्षण केंद्रात फक्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी दोन अतिरिक्त आरक्षण तिकीट खिडक्या सुरू केल्या आहेत. ११ ते ३१ जुलै दरम्यान या खिडक्या कार्यान्वित राहणार आहेत.

या सेवेचा शुभारंभ ११ जुलै रोजी खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते संपन्न झाला. कोकणवासीयांनी या सेवेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी केले. गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर होण्यासाठी खासदार नरेश म्हस्के प्रयत्नशील असतात. गतवर्षी प्रमाणे यावर्षीही त्यांच्या पाठपुराव्याम ुळे गणेशोत्सवानिमित्त ठाणे रेल्वे स्थानकातील आरक्षण केंद्रात कोकण रेल्वेच्या तिकीटासाठी दोन अतिरिक्त खिडक्या सुरु झाल्या आहेत.




## खासदार म्हस्के यांच्या हस्ते उद्घाटन

खिडक्यांची संख्या वाढल्याने गणेशभक्तांची वेळ आणि रांगेत उभे राहण्याची दमछाक कमी होणार आहे. मतदारसंघातील कोकणवासीय बांधवांनी केलेल्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर रेल्वे प्रशासनाने सावंतवाडी स्थानकावर ३ प्रमुख गाड्यांना थांबा देण्याची मागणी मान्य केली आहे. ट्रेन नंबर १२१३३ - मंगलोर एक्सप्रेस, ट्रेन नंबर १२४३१ - राजधानी एक्सप्रेस, ट्रेन नंबर १२२०१ - गरीब रथ एक्सप्रेस या गाड्या लवकरच सावंतवाडी स्थानकावर थांबणार आहेत. या म हत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल खासदार नरेश हस्के यांनी रेल्वे प्रशासन आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे जाहीर आभार मानले आहेत.

ठाणे स्थानकावरील प्रवाशांच्या सोयीसाठी आणि पावसाळ्यातील समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अनेक विकासकामे वेगाने पूर्ण केली जात आहेत. दरवर्षी पावसाळ्यात ठाणे स्थानकात साचणाऱ्या पाण्याच्या समस्येवर मात करण्यासाठी भूमिगत 'मायक्रोटेनल' चे काम पूर्ण झाले आहे. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात ठाणे स्थानक परिसरात कुठेही पाणी साचलेले नाही, ही ठाणेकरांसाठी अत्यंत समाधानकारक बाब आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक ५ आणि ६ वर नवीन एस्केलेटरचे (सरकते जिने) काम सुरू असून ते लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होईल.

तसेच, प्लॅटफॉर्म क्रमांक १ आणि २ वरील सार्वजनिक प्रसाधनगृहांचे नूतनीकरणाचे काम वेगाने सुरु आहे, अशी माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी माध्यमांना दिली. यावेळी रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी सुशांत मिश्रा, अपर्णा देवधर, मिलिंद शिंदे, शशांक सरतूर, रणजीत सिंह, प्रमिला देवगण, लुसी कुजूर, रेल्वे कर्मचारी युनियनच्या पदाधिकारी मानसी जोशी, शिवसेना गटनेते पवन कदम, विलास जोशी, माजी नगरसेवक भास्कर पाटील, बाळा गवस, जगदीश थोरात, किरण नाकती, प्रशांत पाटील, प्रकाश पायरे, सचिन चांदगुडे, वैभव ठाकूर, प्रितम राजपूत, अशोक कदम, निलेश महाडीक, शोएब शेख, गौरी गणपती उत्सव ठाणे मंडळाचे पदाधिकारी बाळा तावडे, महेंद्र जाधव, प्रदीप वारीसे, प्रदीप शितप, समीर शिर्के, तुषार पवार, निलेश गावंडे, भालचंद्र मोरये, अशोक कदम आणि सुरेश पलांडे आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजिव कुलकर्णी यांनी परिश्रम आणि पाठपुरावा केला.

# डी.वाय.एस.पी पाचोरकर, पोलिस निरीक्षक तारू यांच्यापुढे अवैध धंदे बंद करण्याचे आव्हान

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१३, पाटण (सातारा) :** पाटण शहरात गेल्या काही महिन्यांपासून अवैध मटका, दारु, जुगार, गांजा, गुटखा प्रमाण वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. अशातच नुकतीच झालेल्या नवीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे आता शहरातील अवैध धंद्यांना आळा बसेल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पाटण उपविभागाचे नवनियुक्त डीवायएसपी सुदाम पाचोरकर आणि पाटण पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक निलेश तारू यांनी पदभार स्वीकारला आहे. पाटण शहरातील अवैध धंदे बंद करण्याचा त्यांच्या पुढे मोठे आव्हान उभे आहे. पाटण शहर आणि परिसरात सध्या खालील अवैध प्रकार म ोठ्या प्रमाणात सुरू आहेत. मटका दारू गांजा गुटखा पाटण शहरातून हद्दपार करायला हवा. यामुळे तरुणाई व्यसनाधीन होत असून कुटुंबांचे संसार उध्वस्त होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

धडक मोहीम राबवून विशेष पथकामार्फत अवैध धंद्यांवर छापे टाकले जातील का?

शहरातील संवेदनशील भाग, शाळा-कॉलेज परिसर आणि बसस्टँड येथे गस्त करण्यात येणार का?

पाटण तालुक्याचे ठिकाण असलेल्या पाटण शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरात अवैध दारू विक्री, मटका गुटखा दारू धंदे हे बंद करण्याचे आव्हान नवनियुक्त आलेल्या डीवायएसपी आणि पोलीस निरीक्षकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**नवीन अधिकाऱ्यांचा पदभार**


गेल्या आठवड्यात पाटण पोलीस ठाण्यात डीवायएसपी, पोलीस निरीक्षकांनी पदभार स्वीकारला. त्याचबरोबर परिसराचे नियंत्रण करणाऱ्या नवीन डीवायएसपींनीही पाटणचा आढावा घेतला. पदभार स्वीकारताच दोन्ही अधिकाऱ्यांनी अवैध धंदे म ुक्त पाटण हा अजेंडा ठरवला आहे. तर नवीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीने पाटण शहरांमध्ये आशेचे वातावरण आहे. गेल्या काही वर्षांपासून कारवाई फक्त कागदावरच व्हायची. पाचोरकर साहेब आणि तारू साहेबांनी जर ठरवले तर पाटण नक्कीच अवैध धंदे मुक्त होईल. अशी प्रतिक्रिया पाटण शहरातील नागरिक देत आहेत

आता डीवायएसपी सुदाम पाचोरकर आणि पीआय निलेश तारू यांच्या नेतृत्वाखाली पाटण पोलीस अंमलबजावणी कितपत करतात आणि पाटण शहराला खऱ्या अर्थाने दिलासा मिळतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मोहम्मद पैगंबरांवरील कथित आक्षेपार्ह वक्तव्यावर काँग्रेस आक्रमक

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१३, परभणी :** दिल्ली भाजपच्या नेत्या नाझिया इलाही खान यांनी विविध सार्वजनिक सभा आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद पैगंबर यांच्याविषयी कथित आक्षेपार्ह व वादग्रस्त वक्तव्ये केल्याचा आरोप करत, त्यांच्या विरोधात तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी आज परभणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, संबंधित वक्तव्यांमुळे देशभरातील मुस्लिम सम ाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून अनेक राज्यांत आंदोलने झाली आहेत. तरीही संबंधितांवर अद्याप कठोर कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी त्वरित गुन्हा नोंदवून निष्पक्ष कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात पुढे असा दावाही करण्यात आला आहे की, गेल्या काही वर्षांत म ुस्लिम समाजाविरोधात सातत्याने आक्षेपार्ह वक्तव्ये होत असून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा प्रकारच्या द्वेषपूर्ण भाषणांवर कठोर निर्बंध आणावेत, तसेच कोणत्याही धर्माविरुद्ध चिथावणीखोर वक्तव्य करणाऱ्यांवर समान कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांसारख्या महापुरुषांविषयीही सोशल मीडियावर होणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट आणि वक्तव्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी प्रभावी कायदेशीर यंत्रणा उभारण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी परभणी ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाबाजानी खान, परभणी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, शहराध्यक्ष अमोल जाधव, महाराष्ट्र सचिव नागसेन भेरजे, जिंतूर तालुका अध्यक्ष केशव बुधवंत, जिंतूर शहराध्यक्ष शेख फिरोज, नगरसेवक तथा गटनेते शेख इस्माईल पहलवान यांच्यासह जिल्ह्यातील सर्व नगरसेवक, विविध सेलचे पदाधिकारी आणि काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या

### आधाराचा नांगर, मायेची पेरणी! संकटग्रस्त दोन शेतकरी भगिनींना 'राहा लालसरे फाउंडेशन'चा मदतीचा हात



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील देवगाव व डोंगरगाव येथील दोन गरजू शेतकरी विधवा महिलांना 'राहा लालसरे फाउंडेशन'च्या वतीने मोफत शेती मशागतीची मदत करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी तथा फाउंडेशनचे अध्यक्ष नितीन लालसरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. देवगाव येथील कै. महेश साबळे यांच्या ट्रॅक्टर अपघातातील निधनानंतर पत्नी सविता साबळे आणि डोंगरगाव येथील कै.सोमनाथ नागरे यांच्या निधनानंतर पत्नी सोनाली नागरे यांच्यावर शेतीची संपूर्ण जबाबदारी आली होती. दोन्ही कुटुंबांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन फाउंडेशनने पुढाकार घेतला. यामध्ये साबळे यांच्या ३ एकर शेतीसह दोन्ही कुटुंबांच्या जमिनींची मोफत नांगरणी, मशागत, पेरणी करून देण्यात आली; तसेच उत्तम दर्जाचे बियाणे व रासायनिक खतेही मोफत उपलब्ध करून दिली.

या संकटकाळात फाउंडेशनने केवळ सहानुभूती न दाखवता प्रत्यक्ष कृतीतून दिलेल्या या आधारामुळे दोन्ही कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, परिसरातून या सामाजिक बांधिलकीचे कौतुक होत आहे. याप्रसंगी संपत नागरे, रविंद्र शिंदे, निलेश सालकाडे, सुनील आव्हाड, दत्तू आव्हाड, ग्रामसेवक रणजीत निकम आदी उपस्थित होते.

### जीवन प्रमाणपत्र व ई - केवायसी तातडीने पूर्ण करा

### तहसीलदार पाठक यांचे पेन्शनधारकांना आवाहन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, तलासरी (पालघर) :** तलासरी तालुक्यातील सर्व पेन्शनधारक लाभार्थ्यांनी आपले हयात प्रमाणपत्र (Life Certificate) आणि e-KYC तातडीने पूर्ण करावे, असे आवाहन तलासरीचे तहसीलदार अमोल पाठक यांनी केले आहे. या संदर्भातील सूचना तहसील कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आली असून, तालुक्यातील लाभार्थ्यांनी आवश्यक प्रक्रिया विलंब न करता पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सूचनेनुसार, ज्यांनी अद्याप हयात प्रमाणपत्र व e-KYC प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांनी ती त्वरित करून घ्यावी. संबंधित प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास पेन्शन वितरणात अडचणी निर्माण होऊ शकतात, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रक्रिया कुठे पूर्ण करता येईल?

जवळचे सीएससी (उडउ) केंद्र / महा-ई-सेवा केंद्र, अधिकृत आधार केंद्र, तहसील कार्यालय, तलासरीलाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह वरील केंद्रांवर भेट देऊन प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच शक्य असल्यास मोबाईल ॲपद्वारेही e-KYC ची सुविधा वापरावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, धान्य दुकानदार, ग्रामविकास अधिकारी आणि सरपंच यांनी ही सूचना गावपातळीवर जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवून जनजागृती करावी, असे निर्देश तहसील प्रशासनाने दिले आहेत.

पेन्शनधारकांना कोणतीही अडचण आल्यास त्यांनी जवळच्या सेवा केंद्राशी किंवा तहसील कार्यालय, तलासरी येथे संपर्क साधून अधिक माहिती घ्यावी, असेही तहसीलदार अमोल पाठक यांनी नमूद केले.

### जिल्हापरिषद शाळा व अंगनवाड्यात शैक्षणिक साहित्य वाटप



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१३, पाटण (सातारा) :** कोल्हापुरच्या श्रीमंत.मालोजीराजे छत्रपति यांच्या वाढदिवसानिमित्त चाफळ व मल्हारपेठ बिटातील ३० जिल्हापरिषद शाळा व अंगनवाड्यात शैक्षणिक साहित्य वाटप.श्रीमंत छ.मालोजीराजे छत्रपती यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून चाफळ व मल्हातपेठ बिटातील ३० जिल्हापरिषद शाळा व अंगवाड्यातील विद्यार्थ्यांना वह्या कंपसापेटी, पेन ,अंकलिपि या शैक्षिणिक साहित्याचे वाटप अभिजित पवार यांच्या हस्ते करणेतवाले आले. कोल्हापूर येथील छत्रपतींच्या गादीचे वंशज श्रीमंत मालोजीराजे छत्रपती यांच्या संकल्पनेतुन चाफळ व मल्हारपेठ विभागातल चाफळ बिटातील कोळेकरवाडी, दाढोलो कोचरेवाडी, म्हाबळवाडी, सडादाढोल, सडा वाघापुर, सडा निनाई, सडा बोडकेवाडी सडा कळकी, गुजरवाडी, बोर्गेवाडी, सलतेवाडी, साखरे, कोतावडेवाडी खोनोली व विहे बिटातिल ठोमसे गणेवाडी तांबेवाडी या जिल्हा परिषद शाळा अंगणवाड्यांना.

शैक्षणिक साहित्य देणेत आले.सामाजिक बांधिलकी जपत राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. याप्रसंगी परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांना वह्या, कंपास पेटी आणि इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी माजी सरपंच दयानंद शिलवंत म्हणाले श्रीमंत छ.मालोजीराजे भोसले यांनी नेहमीच जनसामान्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या ५० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना म दत करणे हा खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याचा गौरव आहे. या साहित्यामुळे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नक्कीच प्रोत्साहन मिळेल.

ठोमसे येथील शालेय मुलाना शैक्षणिक साहित्य वाटप करताना अभिजित पवार चेअरमन सखाराम देसाई माजी सरपंच दयानंद शिलवंत समवेत सुभाष लोहार